| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र शासन | **शिक्षण संचालनालय**<br>(माध्यमिक व उच्च माध्यमिक)<br>महाराष्ट्र राज्य<br>मध्यवर्ती इमारत, ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११ ००१ | w'site : education.maharashtra.gov.in<br>e-mail : doehighersec@gmail.com<br>Phone : (020) 2612 1396 / 1394 |


**क्र.उच्च माध्य २८६/ग्रंथपाल उन्नयन/२०१९**
**दिनांक :-२७/०९/२०१९**

**प्रति,**

१. **शिक्षणाधिकारी (माध्यामिक), जिल्हा परिषद, सर्व**
२. **शिक्षण निरीक्षक, बहन्मुंबई (पश्चिम/उत्तर/दक्षिण).**

**विषय :- राज्यातील खाजगी अनुदानित शाळेतील अर्धवेळ ग्रंथपाल यांचे पुर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन करणेबाबत ..**

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र.एसएसएन २०१८/(प्र.क्र.२४३/१८)/टीएनटी-२ दि.०१ सप्टेंबर, २०१८

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, राज्यातील खाजगी अनुदानित शाळेतील सेवाज्येष्ठ असणारे अर्धवेळ ग्रंथपाल यांना पूर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन करणेबाबत संदर्भाधीन दि.०१.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

जिल्हानिहाय कार्यरत मान्यता प्राप्त व सध्यस्थितीत १०० टक्के वेतन घेणारे अर्धवेळ ग्रंथपाल यांचे नांव, संवर्ग, जन्मदिनांक, रुजू दिनांक, इत्यादी बाबींची पडताळणी करुन संबंधित शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर यादी प्रसिध्द करुन प्राप्त अक्षेपानंतर सुधारित करुन या संचालनालयास सादर केली आहे. सदरची यादी सेवेत रुजू दिनांकाच्या चढत्या क्रमाने नमूद करुन **education.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे. याबाबत संबंधीत कर्मचारी/ शाळा/ व्यवस्थापन यांच्या निदर्शनास अणावे.

संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत आलेल्या यादीमध्ये काही अक्षेप/ हरकती असल्यास, आवश्यकत्या कागदोपत्री पुराव्यासह संबंधीत जिल्हाचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), यांचेकडे दिनांक ०५.१०.२०१९ पर्यंत सादर कराव्यात. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), यांनी हरकती असलेल्या बाबी तपासून आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह दिनांक ०७.१०.२०१९ रोजी खास दूता मार्फत या संचालनालयास सादर करावव्यात.

**अर्धवेळ ग्रंथपाल यांची यादी तयार करताना पुढील बाबी विचारात घ्याव्यात.**

१. यादीमध्ये केवळ १०० टक्के खाजगी अनुदानित शाळेतील कार्यरत मान्यता प्राप्त अर्धवेळ ग्रंथपाल यांचा समावेश असावा. सैनिकी शाळा व अन्य व्यवस्थापनाच्या शाळेतील तसेच सेवानिवृत्त झालेल्या अर्धवेळ ग्रंथपाल यांना वगळण्यात यावे.
२. अर्धवेळ पदांवरील रुजू दिनांक व जन्म दिनांक **DD-MM-YYYY** या फॅारमॅट मध्ये आहेत, फॅारमॅट मध्ये बदल करु नये.

**(दिनकर पाटील)**
**शिक्षण संचालक**
**(माध्यमिक व उच्च माध्यमिक)**

**प्रत:** १.मा.आयुक्त,शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.श्रीमती चारुशीला चौधरी, उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव
३.विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व) यांना माहितीस्तव

**प्रत: प्रसिध्दीसाठी ई-गव्हर्नंन्स सेल महाराष्ट्र राज्य,पुणे**

Granthpal 2019 unnayan

Scanned by CamScanner